# Newspaper: Maharashtra Times

# Article date : 29 July 2017

# On day article

## पोदारचा 'बॅटल ऑफ बिड्स'

**अस्मिता जाधव, आदेश पुरंदरे,**
कॉलेज क्लब रिपोर्टर

बेरीज, वजाबाकी, भागाकार, गुणाकार...अशी ही गणितातील सूत्र कानावर पडताच अंगावर शहारा येतो. दोस्तांनो, आपल्यापैकी बहुतेक जणांना शाळेत गणित या विषयाची प्रचंड भीती वाटायची. अवघड अशा गणित या विषयावर संपूर्ण फेस्टिव्हल आयोजित केला हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटणं सहाजिक आहे. नुकताच माटुंग्याच्या पोदार कॉलेजमध्ये मॅथेमॅट्रीक्स हा दोन दिवसीय फेस्ट मोठ्या उत्साहात पार पडला. या दोन दिवसात गणितातल्या अनेक गमतीजमती फेस्टमुळे कळण्यास मदत झाली. या फेस्टचा





महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर होता.

फेस्टमधील प्रदर्शनाला 'दा विंचीज ब्रिज', 'वॉर' इत्यादी अनेक स्टॉलजवळ गर्दी जमली होती. शाळेतील व कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांमध्ये बऱ्याच स्पर्धा रंगल्या. प्रॉब्लेम सॉलव्हिंग सेशन्समधून मुलांना गणित सोडवायला विविध टिप्स देण्यात आल्या आणि मुलांच्या शंकांचे निरसन करण्यात आलं. 'न्युम्रो आर्ट' या स्पर्धेमध्ये गणिताशी नाते असलेल्या गोष्टी म्हणजे चिन्हांच्या मदतीने व कलेची साथ असलेल्या या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. 'मॅथ मेनियॅक' या स्पर्धेमध्ये गणितात निपुण असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा रंगली. 'मूव्ह विथ मॅथ्च' या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांची गणिते सोडवतानाची चपळता बघायला मिळाली. 'बॅटल ऑफ बिड्स' या स्पर्धेने स्पर्धकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. काही पालक सांगत होते की, 'आम्ही आमच्या पाल्यांना मॅथेमॅट्रिक्ससाठी या पुढेदेखील आवर्जून आणू'. हेच मॅथेमॅट्रिक्सचं खरं यश आहे हे म्हणायला हरकत नाही. अशा विविध स्पर्धा, सेमिनार्समधून गणितातील गमती-जमती जाणून मुलांच्या मनात गणिताविषयी आवड निर्माण होताना दिसली. मॅथेमॅट्रिक्सच्या निमित्ताने बऱ्याच जणांची गणित विषयाची गोडी वाढली, हे मात्र नक्की.

### फेस्टिव्हल साजरा करा मुंटासोबत

**हाय फ्रेंड्स, तुमच्या कॉलेजचा फेस्टिवल सॉल्लिड हटके आहे असं तुम्हाला वाटतंय ना? तुमच्या फेस्टिव्हलमधल्या वेगवेगळ्या घडामोडी, त्यातले काही खास क्षणांचे फोटोही आमच्याशी शेअर करा. फेस्टिवलची माहिती, फोटोज 'मुंटा'मध्ये प्रसिद्ध होतील. खाली दिलेल्या इमेल आयडीवर तुमच्या फेस्टची माहिती कळवा. कॉलेजचं, फेस्टिवलचं नाव, कोऑर्डिनेटरचा संपर्क क्रमांक या गोष्टी त्यात नक्की असू द्या.**

muntainbox@gmail.com